# उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा

मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई
यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, पोटमाळा, कक्ष क्र. १७६, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
ईमेल – dyr.mhada176@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५०९२/५०९३

जा.क्र.उनि/कोम/बी-२/2356/२०२५
दिनांक : २८/०७/२०२५

**विषय : - पवई जलवायू विहार टाईप सी को-ऑप हौसिंग सोसायटी, आदि शंकराचार्य मार्ग, हिरानंदानी गार्डन जवळ, पवई, मुंबई -४०००७६ या संस्थेच्या पुनर्विकासाबाबत.**

संदर्भ :- १) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सगृयो - २०१८/प्र.क्र.८५/ १४-स, दिनांक ०४/०७/२०१९.
२) संस्थेचा दिनांक ११/०७/२०२५ चे पत्र.
३) या कार्यालयाकडील प्राधिकृत अधिकारी नियुक्तीचे दि.१८/०७/२०२५ रोजीचे पत्र.
४) संस्थेचे दि.२०/०७/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.
५) प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयात दि.२९/०७/२०२५ रोजी सादर केलेला अहवाल.

उपरोक्त नमुदप्रमाणे पवई जलवायू विहार टाईप सी को-ऑप हौसिंग सोसायटी, आदि शंकराचार्य मार्ग, हिरानंदानी गार्डन जवळ, पवई, मुंबई -४०००७६ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आहे. संस्थेने संदर्भ क्र. २ नुसार संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाविषयक विशेष सर्वसाधारण सभेस शासनाचे दि.०४ जुलै २०१९ च्या परिपत्रकानुसार प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करण्याकरीता विनंती केलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्र ३ नुसार दिनांक १८/०७/२०२५ च्या पत्रान्वये श्री. महेश नलावडे, सहकारी अधिकारी श्रेणी -२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. संस्थेने दिनांक २०/०७/२०२५ रोजी बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेस प्राधिकृत अधिकारी यांनी उपस्थित राहुन अहवाल या कार्यालयास संदर्भ क्र. ५ अन्वये दिनांक २९/०७/२०२५ रोजी सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन करता सदर संस्थेत एकुण १२६ सदनिका असून १२६ सभासद आहेत. त्यापैकी सर्वसाधारण सभेस एकूण १२६ सभासदांपैकी ९३ सभासद उपस्थित होते. म्हणजेच २/३ पेक्षा जास्त सभासद उपस्थित होते. दि.२०/०७/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सभासदांना संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाचे प्रक्रियेसंबंधी संस्थेचेवतीने तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी शासनपरिपत्रकाची माहिती देण्यात आली आणि पुनर्विकास प्रक्रियेसंबंधी तसेच विकासकाचे नेमणूकीसंबंधी ठराव मांडण्यात आला असता सदरच्या ठरावास उपस्थित ९३ सभासदांपैकी ९१ सभासदांनी **मे.एविटा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हिरानंदानी कन्स्ट्रक्शन)** M/s. Evita Construction Pvt. Ltd. (Hiranandani Constructions) या विकासकास सहमती दर्शविली. तर ०२ सभासदांनी कोणत्याही विकासकास सहमती दर्शविलेली नाही. त्यामुळे बहुमताने **मे.एविटा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हिरानंदानी कन्स्ट्रक्शन)** M/s. Evita Construction Pvt. Ltd. (Hiranandani Constructions) १ ला मजला, ऑलिंपिया, हिरानंदानी बिझनेस पार्क, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई - ४०००७६ या विकासकाचे नियुक्तीस सहमती दर्शवून मान्यता दिल्याचे दिसून येते. संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित शासन निर्णयातील तरतुद क्र.१८ मध्ये विहित केलेल्या बँक गॅरंटीसह सर्व तरतुदींचे पालन करून विकासकासोबत विकास करारनामा करण्याची व त्याप्रमाणे पुर्नविकास प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी व्यवस्थापक समितीची राहिल असे प्राधिकृत अधिकारी यांच्या अहवालात नमूद असून प्राधिकृत अधिकारी यांचा अहवाल व संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पाहता, सदर संस्थेबाबत पुढील उचित कार्यवाहीकरीता प्रस्ताव निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

(अभिजीत देशपांडे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा

प्रति,
निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ.

प्रत :-
१) अध्यक्ष / सचिव, पवई जलवायू विहार टाईप सी को-ऑप हौसिंग सोसायटी, आदि शंकराचार्य मार्ग, हिरानंदानी गार्डन जवळ, पवई, मुंबई -४०००७६.

यांनी संस्थेच्या सभासदांचे लेखी संमतीपत्र निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ यांच्याकडे पाठविण्यात यावे.

२) मे.एविटा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हिरानंदानी कन्स्ट्रक्शन) M/s. Evita Construction Pvt. Ltd. (Hiranandani Constructions) १ ला मजला, ऑलिंपिया, हिरानंदानी बिझनेस पार्क, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई - ४०००७६

उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा